**First Semester Model Question Paper – 2024 / 2025**

**Std - IX** **MCQ** **Sub - Marathi**

**Marks - 40** **Duration : 1HR.**

१.लहानपणी लेखक शांताराम जाधव यांच्या घरची आर्थिक स्थिती----------------------
A.उत्तम होती.
B.मध्यम होती.
C.हलाखीची होती.
D. कठीण होती.

२.लोहियांना सभास्थानी आणण्याचे काम -------------------
A.लक्ष्मीदास बोरकर यांच्याकडे सोपविण्यात आले होते.
B. डॉ.ज्युलियांव मिनेझीस यांच्याकडे सोपविण्यात आले होते.
C.विश्वनाथ लवंदे यांच्याकडे सोपविण्यात आले होते.
D.व्यंकटेश वेरेकर यांच्याकडे सोपविण्यात आले होते.

३.रमाला कोणत्या गोष्टीचा गर्व होता?
A.हुशारीचा
B.श्रीमंतीचा
C.घराचा
D.सौंदर्याचा

४.आपले काम केल्याबद्दल मुलाची ताई त्याला काय देणार होती ?
A.दहा पैसे
B.खाऊ
C.पुस्तक
D .पतंग

५.आखडला दानासाठी त्याले ---------------------------------
A.पाय म्हनू नही
B.हात म्हनू नही
C.नेक म्हनू नही
D.लेक म्हनू नही

६.तुका म्हणे एका देहाचे अवयव
सुख दुःख --------------- भोग पावे ।।
A.आत्मा
B.मन
C.जीव
D.प्राण

७.कशाचा भारा घेऊन आई चालत असते ?
A .दुःखाचा
B.व्यथेचा
C. वेदनेचा

D. संकटाचा

८.उंदिरमामाचा खजिना कोठे आहे ?
A.घरात
B.खबदाडीत
C.बिळात
D.रानात

९. गोकुळ बनणे म्हणजे-
A .ऐट दाखविणे
B .प्रसिद्धी मिळवणे
C . समृद्ध बनणे
D. नि:स्वार्थी बनणे

१०. ‘ जल्लोष करणे’ या वाक्प्रचाराच्या उपयोगाचे खालीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे ?
A. होळीच्या दिवसात मुले जल्लोष करतात.
B. होळीच्या दिवसात मुले आनंद व्यक्त करतात.
C. होळीच्या दिवसात मुले जल्लोष करणे .
D.होळीच्या दिवसात मुले आनंद व्यक्त करणे.

११. सारी पोरे खदखदा हसली या वाक्यातील 'खदखदा ' -
A.उभयान्वयी अव्यय
B.शब्दयोगी अव्यय
C.केवलप्रयोगी अव्यय
D.क्रियाविशेषण अव्यय

१२. मला खरंच काही सुचत नाही. या वाक्यातील 'मला'------------
A. नाम
B.सर्वनाम
C.विशेषण
D. क्रियापद

१३.'चपळ' या शब्दाचे भाववाचक नाम
A.चपळपणा
B.चपळगिरी
C.चपळाई
D.चपळशीर

१४.लोकांची उत्सुकता शिगेस पोचली होती. या वाक्याचा काळ ----------
A.अपूर्ण भूतकाळ
B.पूर्ण भूतकाळ
C.पूर्ण भविष्यकाळ
D.अपूर्ण भविष्यकाळ
१५. शाळा आमच्या घरासमोरच आहे. या वाक्याचा काळ

A. पूर्ण वर्तमानकाळ
B.अपूर्ण वर्तमानकाळ
C.पूर्ण भूतकाळ
D.अपूर्ण भूतकाळ

१६.'बल' या शब्दाचा समानार्थी शब्द --------
A.साहस
B.धाडस
C.धैर्य
D.शक्ती

१७.'नाठाळ' या शब्दाचा समानार्थी शब्द ---------
A.दुष्ट
B.वाईट
C.वेडा
D.कुरूप

१८.'निर्बंध' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ---------------
A.ननिर्बंध
B.सनिर्बंध
C.अनुर्बंध
D.अनिर्बंध

१९.'यश' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द -------------------
A.अयश
B.अनयश
C.अपयश
D.नायश

२०.खालीलपैकी कोणते वाक्य शुद्ध आहे ?
A.प्रत्येकाने कागदाच्या ऊजव्या कोपऱ्यात नाव गातले.
B.प्रत्येकाने कागदाच्या उजव्या कोपऱ्यात नाव घातले.
C.प्रत्येकाने कागदाच्या उजव्या कोपऱ्यात नाव गातले.
D.प्रत्येकाने कागदाच्या ऊजव्या कोपऱ्यात नाव घातले.

२१.खालीलपैकी कोणते वाक्य शुद्ध आहे?
A.त्याचा प्रश्न एकून मि थक्कच झालो.
B.त्याचा प्रश्न ऐकून मि थक्कच जालो.
C.त्याचा प्रश्न ऐकून मी थक्कच झालो.
D.त्याचा प्रश्न एकून मी थक्कच जालो.

२२.पुढील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य विरामचिन्ह निवडा.

वा रे वा --- मी अभ्यास करतोय म्हटलं!

A. ?

B. -

C. !

D. .

२३.'अवशेष 'म्हणजे -------------
A.शिल्लक राहिलेला भाग
B.संपलेला भाग
C.नष्ट झालेला भाग
D.संपूर्ण भाग

२४. मध्ये मध्ये बोलणे म्हणजे ----------------------
A.तोंडाळ
B.वाचाळ
C.चोंबडेपणा
D.वायफळ

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

ज्यांना श्रेष्ठ विचारांची साथ असते ते कधीच एकटे नसतात.' असे सर फिलीप सिडनी यांचे म्हणणे आहे.श्रेष्ठ विचारांचे दोन मुख्य स्त्रोत असतात. पुस्तके आणि सत्संगती. सत्संगाचा फायदा घेण्यासाठी पुस्तकी ज्ञान आवश्यक असते. पुस्तकांचे अध्ययन आणि वाचलेल्या गोष्टींवर मनन, चिंतन केल्यानंतर श्रेष्ठ विचारांचा उदय मनांत होत असतो. असे म्हटले जाते की जो वाचन करतो पण चिंतन करीत नाही त्याला कोणतेही भविष्य नसते.जो केवळ चिंतन करतो पण वाचन करीत नाही तो कायम संकटग्रस्त असतो. महाभारत, गीता, रामचरित मानस, गुरूग्रंथसाहेब इ. ग्रंथ असे आहेत की जे प्रत्येक संकटाच्या वेळी आपले मनोबल वाढवितात. दुसऱ्या महायुद्धातील कित्येक युद्धकैद्यांनी पुस्तकांच्या आधारे आपले तुरुंगातील जीवन धैर्याने घालविले. आफ्रिकेतील निग्रो नेते डॉ. नेल्सन मंडेला यांनी आपले २७ वर्षांचे बंदिवासातले जीवन पुस्तकांच्या आधारेच घालविले होते. जगातील सर्व ज्ञान पुस्तकामध्येच आहे व त्यांच्याद्वारेच ते जगासमोर येते. पुस्तकांच्या अध्ययनाद्वारे आपण ऋषींचे ऋण फेडू शकतो. ऋषींचे ऋण फेडण्यासाठी श्रेष्ठ ग्रंथांचे अध्ययन करून ते ज्ञान इतरांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असते.पुस्तके आपले असे मित्र आहेत ज्यांची आपल्याकडून काहीच अपेक्षा नसते. त्यांच्याद्वारे आपण जगातील प्रत्येक पदार्थ, विषय व त्यांच्याशी संबंधित प्रत्येक गोष्टींचे ज्ञान प्राप्त करू शकतो. पुस्तके आपणास किती उपयोगी पडतात हे सांगताना रवींद्रनाथ म्हणतात ‘डोळ्यांसमोर जी वस्तू पडलेली असते तिची माहिती मिळवण्यासाठी पुस्तकांचेच तोंड पाहावे लागते.’ ज्ञान देण्याव्यतिरिक्त पुस्तके एका ख-या हितचिंतकाप्रमाणे आपले धैर्य वाढवितात, साहस, आशा, प्रेरणा देतात.अनेक इतिहासप्रसिद्ध व्यक्ती अशा आहेत ज्यांनी संपत्ती सुखोपभोगापेक्षा चांगल्या ग्रंथालयाला जास्त महत्त्व दिले. प्रसिद्ध विचारवंत प्रोक्टर म्हणाले होते, ‘माझ्या ग्रंथालयात माझे मौन सेवक चौफेर माझी वाट पाहत राहतात.’ पुस्तके वाचताना माणूस स्वत:ला विसरून जातो. म्हणून पुस्तके वाचल्यामुळे ब्रह्मानंदाची प्राप्ती होते. भारतीय विचारवतांनी ज्ञानार्जनाला ईश्वर, स्मरणाच्या बरोबरचा दर्जा दिला आहे.पुस्तकांनी अनेक व्यक्तींचे जीवन घडविले आहे. असंख्य वाचकांचे मनोरंजन केले आहे.पुस्तकांचे अध्ययन, पारायण, आत्मिक विकास व मनोरंजनाचे साधन आहे. पुस्तकांसारख्या मित्रांच्या सहवासात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व चारित्र्याचा विकास होतो.पुस्तकांच्या

सतत सहवासामुळे मिळणारा आनंद अनिर्वचनीय असतो. त्यामुळे जगातील इतर सुखांचा विसर पडतो. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे.’असे म्हणणारे लो. टिळक म्हणत, ‘मी नरकातही चांगल्या पुस्तकांचे स्वागतच करीन कारण त्यांच्यात ते जिथे असतील तिथे स्वर्ग निर्माण करण्याची शक्ती असते.’

गांधीजीच्या मते, ‘पुस्तकांचे मूल्य हि-यांपेक्षा जास्त आहे. कारण हि-यांची चमक बाहेर दिसते तर पुस्तकांची चमक अंत:करणाला उजळून टाकते.’ चांगली पुस्तके आपल्याजवळ असल्यावर चांगले मित्र आपल्याबरोबर नसल्याची खंत वाटत नाही. एका अरबी विचारवंताच्या मते, ‘पुस्तके ही खिशात ठेवलेली बाग आहे. जी आपल्या मनाला सदैव सुवासिक व प्रसन्न ठेवते.’ पुस्तके आणि ग्रंथालय ही कोणत्याही राष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाचा दर्जा दर्शवितात.म्हणून पुस्तकांनाच आपले मार्गदर्शक बनवा आणि सर्व समस्यांवरील अमोघ अस्त्र मिळवा.

२५. उज्चल भविष्यासाठी…………….

A केवळ चिंतन आवश्यक आहे.

B वाचन व चिंतन आवश्यक आहे.

C वाचन व विस्मरण आवश्यक आहे.

D केवळ वाचन आवश्यक आहे.

२६. डॉ. नेल्सन मंडेला यांनी आपले २७ वर्षांचे बंदिवासातले जीवन……

A औषधांच्या आधारेच घालवले होते.

B लेखनाच्या आधारेच घालवले होते.

C पुस्तकांच्या आधारेच घालवले होते.

D इच्छाशक्तीच्या आधारेच घालवले होते.

२७. ‘माझ्या ग्रंथालयात माझे मौन सेवक चौफेर माझी वाट पाहत असतात' हे उद्गार कोणाचे आहेत ?

A प्रोक्टर

B नेल्सन मंडेला

C लो. टिळक

D वॉल्टेअर

२८. पुस्तके वाचून ब्रह्मानंदाची प्राप्ती होते कारण पुस्तके वाचताना माणूस…….

A स्वतःच्या चिंता विसरतो.

B स्वतः चे रोग विसरतो.

C स्वतःची दुःखे विसरतो.

D स्वतःला विसरतो.

२९. ऋषींचे ऋण फेडण्यासाठी काय करावे?

A श्रेष्ठ ग्रंथांचे फक्त अध्ययन करावे.

B श्रेष्ठ ग्रंथांचे अध्ययन व ज्ञानदान करावे.

C श्रेष्ठ ग्रंथ फक्त संग्रही ठेवावेत.

D श्रेष्ठ ग्रंथांचे पूजन व द्रव्यदान करावे.
३०. पुस्तके व ग्रंथालये कोणत्याही राष्ट्राच्या…..
A सांस्कृतिक विकासाचा दर्जा दर्शवितात.
B आर्थिक विकासाचा दर्जा दर्शवितात.
C राजकीय विकासाचा दर्जा दर्शवितात.
D शैक्षणिक विकासाचा दर्जा दर्शवतात.

३१. अनेक इतिहास प्रसिद्ध व्यक्तींनी जास्त महत्त्व कोणाला दिले?
A सुखोपभोगांना
B ग्रंथालयांना
C मानसन्मानांना
D वैद्यकीय केंद्रांना

३२. श्रेष्ठ विचारांचे दोन मुख्य स्रोत…..
A पुस्तके व चर्चा
B सत्संगती व देवाची कृपा
C पुस्तके व सत्संगती
D सत्संगती व गुरुची कृपा

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.
बिनरंगांच्या जीवनाची कल्पना करणेसुद्धा शक्य नाही. रंग हे विविधता, सौंदर्य, ताजेपणा, आवड आणि आकर्षणाचा पर्याय बनले आहेत. रंगांचा स्वतःचा एक अद्‌भुत आणि मनोहर असा संसार आहे.निरनिराळ्या रंगांचा निरनिराळा अर्थ असतो. उदा. आपल्या तिरंगी झेंड्यातील केशरी रंग वीरत्वाचे प्रतीक आहे. पांढरा रंग शांती आणि सामंजस्याचे, हिरवा रंग कृषी आणि वनस्पतीचे प्रतीक आहे. साधुसंन्यासी लोक भगवे वस्त्र परिधान करतात कारण हा रंग ज्वाला आणि अग्नीचे प्रतीक आहे. अशाच प्रकारे वाहतुकीच्या सिग्नलमधील लाल,पिवळा , हिरवा हे रंग वेगवेगळा संकेत देत असतात. नर्स व डॉक्टर पांढरा गणवेश घालतात. कारण हा रंग शांती, सेवा आणि समर्पणाचे प्रतीक आहे. रंगांची विविधता अलौकिक आहे. एकाच रंगाची अनेक चित्रे आणि छायाचित्रे असतात. दोन किंवा दोनापेक्षा जास्त रंग मिळून एक वेगळाच रंग निर्माण होतो. जे वर्णांध असतात त्यांना आपण किती दुर्दैवी आहोत हे माहिती असते कारण त्यांचे डोळे विविध रंग पाहू शकत नाहीत. रंगांचा आनंद घेऊ शकत नाहीत. अनेक जनावरे जसे कुत्रे, मांजर, बैल, ससे इत्यादी वर्णांध असतात. याउलट मधमाशा साप, पाली,पक्षी अनेक प्रकारचे मासे रंग पाहू व ओळखू शकतात.
लाल, निळा आणि हिरवा या रंगांना प्राथमिक रंग म्हणतात. त्यांना विविध प्रमाणात एकमेकांत मिसळून दुसरे रंग तयार करता येतात. जर हे सारख्या प्रमाणात मिसळले तर पांढरा रंग तयार होतो. तात्पर्य, पांढरा रंग या तीन रंगांचे मिश्रण आहे. रंगाचा प्रकाशाशी दाट व प्रत्यक्ष संबंध आहे. प्रकाशाशिवाय रंग असू शकत नाहीत . प्रकाशाच्या श्वेत किरणात इंद्रधनुष्याचे सात रंग असतात. प्रकाश किरणे, जेव्हा प्रिझममधून जातात तेव्हा हे सात रंग स्पष्ट दिसतात. यास स्पेक्ट्रम म्हणतात. सर्वप्रथम आयझॅक न्यूटन यांनी एका प्रिझममधून प्रकाश किरणे पाठवून हा प्रयोग केला होता. त्यांनीच या प्रकाश स्पेक्ट्रमचा शोध लावला. प्रिझम प्रकाशाच्या श्वेत किरणांना सात रंगांत विखरून टाकतो.पाण्याचे लहान लहान थेंब पण हे कार्य सहजपणे करू शकतात. परिणामी आपण इंद्रधनुष्य पाहू शकतो.

जर हे सात रंग एकात मिसळले तर पुन्हा ते पांढऱ्या रंगात परिवर्तीत होतील. प्राथमिक रंगांचे मिश्रण केल्यावर जे रंग तयार प्राप्त होतात त्यास पूरक रंग म्हणतात.उदा.लाल व हिरव्या रंगाचा प्रकाश मिसळून पिवळा रंग तयार होतो.वस्तू रंगीत दिसतात कारण त्या एका विशेष रंगाला परावर्तीत करुन अन्य रंगांना आपल्यात सामावून घेतात. निळ्या प्रकाशात हिरव्या वस्तू काळ्या दिसतात.त्याचप्रमाणे लाल प्रकाशात हिरव्या वस्तू काळ्या दिसतात.
हे तर सर्वांना माहीतच आहे की काळा रंग प्रकाशाचे विकिरण करीत नाही. कृष्णविवर हे या रंगाचे एक चांगले व आश्चर्यकारक उदाहरण आहे. या काळ्या व विशालकाय आकाशस्थ विवरांचे गुरुत्वाकर्षण इतके तीव्र असते की त्याच्याजवळ गेलेली कोणतीही वस्तू आत खेचली जाते. म्हणूनच ही कृष्णविवरे दिसत नाहीत.

३३. प्राथमिक रंगांचे मिश्रण केल्यावर जे रंग तयार होतात त्यांना……
A पूर्वरंग म्हणतात.
B पूरक रंग म्हणतात.
C पूर्ण रंग म्हणतात.
D पुरवणी रंग म्हणतात.

३४. रंगांचा स्वतःचा एक अद्भुत आणि मनोहर असा……
A पसारा आहे.
B व्याप आहे. .
C प्रपंचआहे.
D संसार आहे.

३५. खालीलपैकी प्राथमिक रंग कोणते आहेत?
A हिरवा, तांबडा, नारंगी
B लाल, निळा,हिरवा
C लाल, पिवळा, पांढरा
D निळा, पिवळा, जांभळा

३६. खालीलपैकी कोणता प्राणी वर्णांध नाही?
A कुत्रा
B बैल
C मांजर
D साप

३७. निळ्या प्रकाशात हिरव्या वस्तू……
A काळ्या दिसतात.
B पिवळ्या दिसतात.
C जांभळ्या दिसतात.
D नारंगी दिसतात.

३८ प्रिझममधून प्रकाश किरणे पाठवून स्पेक्ट्रमचा प्रयोग कोणी केला?
A अल्बर्ट आइन्स्टन
B थॉमस एडिसन
C आयझॅक न्यूटन
D स्टीफन हॉकिंग

३९. पुढीलपैकी कोणता रंग प्रकाशाचे विकिरण करीत नाही?
A काळा
B निळा
C पिवळा
D हिरवा

४०. प्रिझम प्रकाशाच्या श्वेत किरणांना……
A पाच रंगात विखरुन टाकतो.
B सात रंगात विखरुन टाकतो.
C सहा रंगात विखरुन टाकतो.
D चार रंगात विखरुन टाकतो.

## First Semester Model Question Paper– 2024 / 2025

**Std - IX** **( SUBJECTIVE Q.PAPER )** **Sub - Marathi**
**Marks - 40** **Duration – 2 Hr.**

खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा. (८)
४१) डॉ. लोहियांच्या कोणत्या निर्भय कृतीने जमलेल्या लोकांना सामर्थ्य दिले?
४२) लेखकाने दूध घालण्याचे काम का स्विकारले?
४३) मुलगा आपल्या घरच्यांची कोणकोणती कामे करतो?
४४) आपू वर्गात उभा राहिल्यावर बागाईतकर मास्तर काय म्हणाले?
४५) साने गुरुजींच्या नजरेला रत्नपारख्याची नजर असे का म्हटले आहे?

खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार ते पाच वाक्यांत लिहा. (६)
४६) सुरभीच्या घरी शिक्षकांनी काय पाहिले?
४७) गरीब असूनही लेखकाचा जुना मित्र आनंदी का वाटतो?
४८) गुरुजींचे हस्ताक्षर कसे होते?

खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा. (४)
४९) संत मुक्ताबाई देव, भक्ती याविषयी काय सांगतात?
५०) कवीच्या आईला जेवण करताना कोणता त्रास सहन करावा लागतो?
५१) माय, लेक व शक्ती यांची कोणती वैशिष्ट्यें बहिणाबाई सांगतात ?

खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार ते पाच वाक्यांत लिहा. (६)

५२) संत मुक्ताबाईनी संतांची कोणती लक्षणे सांगितली आहेत?

५३) तुमची शाळा व बिनभिंतीची शाळा यामध्ये कोणता फरक आहे ?

५४) संत तुकारामांनी भक्तांचे कोणते विशेष गुण सांगितले आहेत?

५५) खालील अपूर्ण गोष्ट पूर्ण करून योग्य शीर्षक लिहा. (५)

एक घनदाट जंगल होते. त्या जंगलात अनेक लहान-मोठे प्राणी राहत होते. एक सिंह त्या जंगलाचा राजा होता. तो अत्यंत क्रूर होता.

५६) रमेश/ रमा गायकवाड, मडगाव,सालसेत - गोवा हा/ ही आपल्या लहान भावाला राज्य पातळीवरील निबंध लेखन स्पर्धेत प्रथम बक्षीस मिळाल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहितो/लिहिते. या पत्राचा नमुना दहा ते पंधरा वाक्यांत लिहा. (५)

५७) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर अठरा ते वीस ओळींत निबंध लिहा. (६)

- माझा आवडता खेळ
- झाडे लावा झाडे जगवा
- क्रांतिकारकाचे आत्मवृत्त
- माझा प्रिय मित्र/ माझी प्रिय मैत्रीण